**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2024: 8.058,**
https://www.srjis.com/issues_data/233
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL, APR-MAY 2024, VOL-12/63

# शिक्षण- प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बी.एड छात्राध्यापकांचे सांघिक अध्यापन वापर एक अभ्यास

**सौ. शोभा संग्राम पाटील**
*सहाय्यक प्राध्यापिका, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा*

**Paper Received On**: 21 April 2024
**Peer Reviewed On**: 30 May 2024
**Published On:** 01 June 2024

**सारांश**

*प्रस्तुत शोधनिबंध बी.एड छात्र शिक्षकांच्या सांघिक अध्यापनाबद्दलच्या अभ्यासाशी संबंधित आहे.अध्यापनाचे तंत्र म्हणजे अध्यापन विषयक घेतलेला पवित्रा. अध्यापन कार्यात विविध पद्धतींबरोबरच तंत्रेही वापरली जातात. यामध्ये प्रश्नोत्तर, नाट्यीकरण, बुद्धिमंथन, चर्चा, सांघिक अभ्यास यांसारख्या अनेक अध्यापन तंत्रांचा समावेश असतो. पाठ प्रभावी व मनोरंजक करण्याचे ते तंत्र आहे. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करणे, त्यांच्यात अभिरुची निर्माण करणे, विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करणे, विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे, विद्यार्थ्यांना स्वतःचे विचार दृष्टिकोण, माहिती सांगण्यास प्रवृत्त करणे, विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमता माहित करून घेणे इत्यादी हेतूने ही तंत्रे अध्यापनात वापरली जातात.*

*बी.एड अभ्यासक्रमात अध्ययन अध्यापन प्रक्रियेत संबंधित अनेक घटकांवरती सखोल चर्चा केली जाते त्यातीलच एक पद्धत म्हणजे सांघिक अध्यापन पद्धती होय. सांघिक अध्यापन तंत्राचा आजच्या काळात शाळांमधून प्रयोग करणे किती हितकारक आहे, तसेच सांघिक अध्यापनाची उपयोगिता छात्र शिक्षकांना समजावी ही भूमिका लक्षात घेऊन संबंधित संशोधन छात्र शिक्षकांच्या सांघिक अध्यापनाच्या अभ्यासाशी संबंधित असून सांघिक अध्यापनाची उपयुक्तता आणखी वाढवण्यासाठी प्रस्तुत संशोधन अभ्यासावरती संशोधन करण्यात आलेले आहे.*

**प्रास्ताविक:** नवोपक्रमातील शिक्षणामध्ये सांचिक अध्यापन ही एक महत्वाची बाब आहे. एकविसाव्या शतकात तंत्रविज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. शिक्षणक्षेत्रातही नवनवीन बदल होत आहेत गतिमान

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

बदलांचा समाज व मानवी जीवनावर परिणाम होणे अपरिहार्य आहे. या बदलांचा स्वीकार केल्याशिवाय शिक्षणाला योग्य गती येणार नाही. चार भिंतीच्या आत चालणा-या अनेक पारंपारिक अध्यापन पध्द्तीवर शिक्षणक्षेत्रातील अनेक विचारवंतांनी आक्षेप घेतले आहेत. प्रस्तुत पारंपारिक पदतीमूळे विद्यार्थी निष्क्रिय बनतात. आकलन, तर्क, विचार इ. शक्तीचा विकास खुंटतो. अवधान फार काळ टिकून राहत नाही. तर अध्ययन अध्यापन नाविन्यपूर्ण असणे ही काळाची गरज बनली आहे. भूतकाळातील घटनांचा अभ्यास व वर्तमानाशी तुलना करून भविष्याचा वेध घ्यायला शिकणारे शिक्षण देणे अपेक्षित आहे. एखादा विषय एखाद्या शिक्षकाने पूर्णपणे शिकविण्याऐवजी विषय घटकांची विभागणी करून एकाहून अधिक अध्यापकाच्या गटाने तो शिकविणे म्हणजे सांघिक अभ्यास तंत्र होय. जे. लाईड ट्रम्प यांनी या तंत्राची सुरुवात केली. सांघिक अध्यापन तंत्राचा अनेक देशांत प्रसार झाला आणि त्यात स्थानिक परिस्थितीनुसार फेरफारही करण्यात आले. या तंत्रातील मुलभूत तंत्रे महत्त्वाची असल्याने शाळा, महाविद्यालयांतून सांघिक अध्यापनासाठी हे तंत्र राबविले जाते. सर्वसाधारणपणे आपल्याकडे एका विषयाचे अध्यापन एक शिक्षक करतो परंतु सांघिक अध्यापनात दोन किंवा अधिक शिक्षक एकाच वर्गाला एकच विषय शिकविण्यासाठी नियोजन, तयारी, प्रस्तुतीकरण व मूल्यमापन करण्याची जबाबदारी उचलतात. समाजात शिक्षकांच्या भूमिकेत फार मोठा बदल झालेला आहे . शिक्षकांना आजच्या जिज्ञासू विद्यार्थ्यांना प्रत्येक क्षेत्रातील परिपूर्ण माहिती असेलच असे नाही अशा प्रसंगी इतर सहकाऱ्यांची मदत घेऊन त्यांना ती माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडता येईल यातून सांघिक अध्यापन ही संकल्पना उदयास आली म्हणून सांघिक अध्यापन म्हणजे काय ते समजून घेणे गरजेचे आहे.

**सांघिक अध्यापन अर्थ** -

१. सांघिक अध्यापन म्हणजे अनेक शिक्षकांनी मिळून शिकविणे होय.

२. विशिष्ट्य विद्यार्थ्यांच्या गटाला एखदया विषयाचे वा घटकाचे दोन किंवा अधिक शिक्षकांच्या संघाने नियोजनपूर्वक केलेले अध्यापन आणि मूल्यमापन म्हणजे सांघिक अध्यापन होय.

३. सांघिक अध्यापनात शिक्षक एकत्र येऊन विचार विनिमय करून अध्यापन करतात.

**सांघिक अध्यापनाचे प्रकार**

१. **शाखीय** - एकाच शाळेतील एका संस्थेतील व एका विषयातील शिक्षक एकत्र येऊन अध्यापन करीत असतात.

२. **आंतरशाखीय** - एकाच संस्थेतील वेगवेगळ्या विषयातील शिक्षक एकत्र येऊन अध्यापन करतात.

३. **आंतरसंस्थात्मक** -विविध संस्थांतील तज्ज्ञ ज्यावेळी एकत्र येऊन अध्यापन करतात. त्यावेळी तो सांघिक अध्यापनाचा आंतरसंस्थात्मक प्रकार होय. हा प्रत्येक स्तरासाठी व प्रत्येक घटकासाठी उपयुक्त प्रकार आहे.

४. **समांतर श्रेणी सांघिक अध्यापन** - समान शैक्षणिक अर्हता, समान अनुभव, तज्ज्ञता असलेले शिक्षक एकत्र येऊन अध्यापन करतात.

५. **श्रेणीबध्द सांघिक अध्यापन** या प्रकारात सुरूवातीस कमी अनुभव तज्ज्ञ शिक्षक विषय प्रवेश करतात व पाठातील सर्व सामान्य संकल्पना सादर करतात. नंतर अधिक अनुभवी तज्ज्ञ शिक्षक आशय अधिक सखोलतेने स्पष्ट करतात.

**सांघिक अध्यापनाची तत्वे** -

१. **कालावधी**- सांघिक अध्यापनामध्ये आशयाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेऊन वेळेचे नियोजन करावे.

२. **उद्‌दिष्टाभिमुख पर्यवेक्षण-** पर्यवेक्षण करीत असताना जी अध्यापनाची उद्‌दिष्टे ठरविली असतील त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न करावा यासाठी कोणती उद्‌यिष्टे ठरविली आहेत हे विचारात घेणे गरजेचे आहे.

३. **योग्य वर्गरचना** - मर्यादित विद्‌यार्थी ही संकल्पना आपणास सध्याच्या वर्गात दिसत नाही सांघिक अध्यापनात उदिष्टांनुरूप वर्गरचना ठेवण्याचा प्रयत्न करावा.

४. **शिक्षकांना कार्याचे योग्य वाटप** -सांघिक अध्यापन सहकार्य तत्वावर आधारित आहे. शिक्षकांनी त्यांच्या क्षमता ,अभिरूची ,गुणवैशिष्ट्ये विचारात घेऊन जवाबदारीचे वाटप करावे.

५. **अध्ययनास पोषक वातावरण-** सांघिक अध्यापनाचे यश तेथे उपलव्ध असणाऱ्या वातावरणावर अवलंबून असते म्हणूनच अध्ययनास पोषक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करावा.

**सांघिक अध्यापनात खालील तीन टप्प्यांचा विचार केला जातो**

१. **नियोजन** - सांघिक अध्यापनाची उदिष्ट निश्चिती, वर्तनबदलाच्या स्वरूपात उदिष्टांची मांडणी, अध्यापनासाठी आशयाची निवड, अध्यापनाची रूपरेषा निश्चिती, सहभागी शिक्षकांना त्याच्या क्षमतेनुरूप कार्यवाटप, मुल्यमापन माधननिश्चिती, पोषक वातावरण निर्मिती या सर्वच घटकांचा सांगोपांग विचार केला जातो.

२. **संघटन** - विद्‌यार्थ्यांच्या गरजा व अडचणी यांचाही विचार घेऊन सांघिक अध्यापनाची कार्यवाही केली जाते. प्रश्न विचारून वातावरण निर्मिती, विद्‌यार्थ्यांच्या भाषेचे ज्ञान लक्षात घेऊन संप्रेषण तंत्राची निवड, कार्याचे वितरण व अमलबजावणी, विद्‌यार्थ्यांना कार्य देऊन, प्रोत्साहन देऊन, अध्ययनास प्रवृत्त करणे हा या टप्प्यातील महत्वाचा भाग होय.

३. **मूल्यमापन** - उदिष्टांनुरूप मूल्यमापन केले जाते उदिष्टपूर्ती कितपत झाली आहे याची पडताळणी केली जाते.

**संशोधन महत्व:** सांघिक अध्यापन तंत्र हे परिणामकारक अध्यापनासाठी महत्त्वाचे आहे सांघिक अध्यापन तंत्रामुळे योग्य अध्ययन अनुभव देता येतात. विद्यार्थ्यांना या तंत्रामुळे आशय लवकर समजण्यास मदत होते. विशेष महत्त्वाची बाब विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे दृढीकरण होते. अध्यापन एकसूरी किंवा कंटाळवाणे न होता त्यामध्ये विद्यार्थ्यांची रुची निर्माण होते. सांघिक अध्यापनामुळे संघातील प्रत्येक छात्र अध्यापक तयारीनिशी अध्यापनात सहभागी होईल. सांघिक अध्यापन तंत्राची संकल्पना समजण्यास मदत होईल त्याचबरोबर सांघिक अध्यापन तंत्र वापरणे विषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

**संशोधनाची गरज:** आज शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नवे नवे प्रयोग केले जातात या नव्या प्रयोगांची माहिती भावी शिक्षकांना किती आहे त्याचे उपयोजन नक्की कसे करावे यासाठी भावी शिक्षकांना नवीन तंत्रांची माहिती किती आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे. तसेच सांघिक अध्यापनाचा फायदा लक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी वाढवणे गरजेचे आहे म्हणून प्रस्तुत संशोधन अभ्यासावरती संशोधन करण्यात आलेले आहे.

**समस्या विधान:** शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बी.एड छात्राध्यापकांचे सांघिक अध्यापन वापर एक अभ्यास

**कार्यात्मक व्याख्या**

१. **शिक्षक प्रशिक्षण कार्यकम** - माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून सेवा करण्यासाठी आवश्यक असे सेवापूर्व प्रशिक्षण देणारे शिक्षण म्हणजे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम होय.

**२. छात्राध्यापक -** शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत भावी शिक्षक (विद्यार्थी ) म्हणून पूर्ण करणारे उपक्रम आणि वर्ग अध्यापन.

**३. सांघिक अध्यापन -** दोन किंवा अधिक छात्र अध्यापक एकाच वर्गाला एकच विषय शिकविण्यासाठी नियोजन, तयारी, प्रस्तुतीकरण व मूल्यमापन करण्याची जबाबदारी उचलतात

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. बी.एड छात्राध्यापकांच्या सांघिक अध्यापन तंत्राच्या वापराचा शोध घेणे.

२. सांघिक अध्यापन तंत्र वापरण्याविषयीच्या जागरूकतेचा शोध घेणे

३. सांघिक अध्यापन तंत्राविषयी छात्राध्यापकांच्या सकारात्मक दृष्टिकोनाचा शोध घेणे.

**संशोधन व्याप्ती**

१. सदर संशोधन शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बी. एड छात्राध्यापकांशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन सातारा ग्रामीण भागातील शाळांशी संबंधित आहे

३. सदर संशोधन हे बी.एड छात्राध्यापकांच्या सांघिक अध्यापनाशी संबंधित आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

१. सदर संशोधन शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बी. एड छात्राध्यापकांपुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन सातारा ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या शाळांपुरतेच मर्यादित आहे.

३. सदर संशोधन हे 2022-23 या शैक्षणिक वर्षातील बी.एड भाग -2 मधील छात्राध्यापकांच्या सांघिक अध्यापनापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धत:** प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन साधने:** प्रस्तुत संशोधनामध्ये सांघिक अध्यापनाशी संबंधित संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे

**नमुना निवड पद्धत:** संभाव्य नमुना निवड पद्धतीतील सुगम यादृच्छिक पद्धती व त्यामधील लॉटरी पद्धतीचा वापर नमुना निवड करण्यासाठी केला आहे.

**संख्याशास्त्रीय साधने:** सांघिक अध्यापनाशी संबंधित प्रश्नावली द्वारे मिळालेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला आहे.

**निष्कर्ष**

१.शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात छात्राध्यापक सांघिक अध्यापन या तंत्राशी परिचित असण्याचे प्रमाण समाधानकारक आहे.

२. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत छात्राध्यापक सांघिक अध्यापन पद्धतीनुसार पाठ आराखडा काढण्याचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून आले.

३. सांघिक अध्यापन नियोजनात छात्राध्यापक स्वतःहून सहभागी होणे, याचे प्रमाण मध्यम असल्याचे दिसून आले

४. सांघिक अध्यापनामुळे अध्यापन आणि अध्ययनाची गुणवत्ता वाढण्यास आणि विद्यार्थ्यांचे अवधान टिकून ठेवण्यास मदत होते असे बहुसंख्य छात्राध्यापकांचे मत असल्याचे दिसून आले.

५. सांघिक अध्यापनामुळे अध्यापन प्रभावी आणि मनोरंजक होते असे बहुसंख्य छात्राध्यापकांना वाटते.

६. सांघिक अध्यापनामध्ये छात्राध्यापकांचा अध्यापनाचा ताण कमी होत असल्याचे बहुसंख्य छात्राध्यापकांना वाटते.

**शिफारशी**

१. आपापसात पूरक चर्चा करून पाठ नियोजन तयार करता येते

२. छात्र अध्यापकांनी सांघिक अध्यापन, प्रकल्प पद्धत,गटचर्चा अशा नवनवीन अध्यापन पद्धतींचा वापर करावा.

३. छात्र अध्यापकांनी सांघिक अध्यापन याविषयी सकारात्मक विचार करावा.

४. सांघिक अध्यापनात सर्व छात्राध्यापकांनी उत्साहाने सहभागी व्हावे.

**संदर्भ सुची**

१. मुळे रा.श.व उमाठे वि.तु. (१६८७), शैक्षणिक संशोधनाचे मुलतत्वे, नागपूर महाराष्ट विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ

२. सप्रे निलीमा, पाटील प्रिती, (२००६), शिक्षणातील विचार प्रवाह कोल्हापूर फडके प्रकाशन

३. संदीप पाटील, इतिहास अध्यापन पद्धती

४. चव्हाण गणेश (2012 )अध्ययन - अध्यापन प्रक्रिया नाशिक :इन साईट पब्लिकेशन